सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

महाराष्ट्र लोकसेवा आयोग

मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००

फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२

Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक:डब्ल्यूईबी-१०२०/सीआर-२६/२०२१/तेवीस दिनांक : २३ सप्टेंबर, २०२१

## -: प्रसिध्दीपत्रक :-

**विषय:-आयोगामार्फत राबविल्या जाणा-या भरतीप्रक्रियांच्या जाहिराती, स्पर्धा परीक्षांचे संभाव्य वेळापत्रक व पदभरतीच्या सद्यस्थितीबाबत**

महाराष्ट्र शासनाकडून सन २०२१ करीता काही पदे/संवर्गाकरीता मागणीपत्र प्राप्त झाली आहेत/होत आहेत. त्यानुसार सन २०२१ मध्ये आज रोजीपर्यंत विविध संवर्गातील १०८० पदांकरीता एकूण १०१ जाहिराती प्रसिध्द करण्यात आल्या आहेत. तसेच दिनांक ३० सप्टेंबर, २०२१ पर्यंत अन्य काही पदे/संवर्गांकरीता मागणीपत्र प्राप्त होणे अपेक्षित आहे. शासनाकडून प्राप्त परिपूर्ण मागणीपत्रानुसार तातडीने जाहिराती प्रसिध्द करण्याची व्यवस्था करण्यात येत आहे.

२. शासनाकडून प्राप्त होणा-या परिपूर्ण मागणीपत्रांच्या आधारे सन २०२१ मधील स्पर्धा परीक्षांकरीता ऑक्टोबर/नोव्हेंबर, २०२१ मध्ये जाहिराती प्रसिध्द करण्याचे आयोगाच्या कार्यालयाचे नियोजन आहे.

३. सन २०२२ या वर्षात राबविल्या जाणा-या स्पर्धा परीक्षांचे संभाव्य वेळापत्रक सन २०२२ करीता शासनाकडून प्राप्त होणा-या मागणीपत्रांनुसार नोव्हेंबर, २०२१ मध्ये जाहीर करण्यात येईल.

४. सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गाच्या आरक्षणासंदर्भातील मा. सर्वोच्च न्यायालयाचे दिनांक ५ मे, २०२१ रोजीचे आदेश व यासंदर्भात शासनाकडून घेण्यात आलेल्या निर्णयास अनुसरुन एकूण ८ परीक्षांचे निकाल सुधारित करुन जाहिर करण्यात आले आहेत. तसेच, ५ परीक्षांकरीता मुलाखतीचा कार्यक्रम राबविण्यात आला आहे.

५. आयोगाकडे विविध टप्प्यावर प्रलंबित असणा-या भरतीप्रक्रियासंदर्भातील अंतिम निकाल प्रसिध्द करण्याबाबतची कार्यवाही दिनांक ३० सप्टेंबर, २०२१ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

ठिकाण:-मुंबई

सहसचिव, माहिती तंत्रज्ञान<br>
महाराष्ट्र लोकसेवा आयोग